# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}**

नागपूर महानगरपालिका, नागपूर व नागपूर @२०२५ यांचे संयुक्त विद्यमानाने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छ मोहल्ला स्पर्धा आयोजित करण्याचे प्रस्तावीत आहे. या स्पर्धेमध्ये शहरातील विविध भागातील जास्तीत-जास्त मोहल्ला सहभागी होण्याकरीता स्वच्छ मोहल्ला स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या मोहल्यामध्ये किमान २०० व जास्तीत जास्त ५०० घरांचा समावेश राहील. स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्याची तपासणी करुन गुणांकन देण्यात येईल.

स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्यामध्ये स्पर्धेच्या कालावधीमध्ये घडुन आलेले विशेष बदल तसेच मोहल्यामध्ये राबविण्यात आलेल्या नाविन्यपुर्ण उपक्रमाबाबतची नोंद घेण्यात येईल. याकरीता विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये कार्यरत स्वच्छ भारत अभियानाचे विभागीय समन्वयक/मा. संपादक यांची मदत घेण्यात येईल तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे दि. ०४/०१/२०२३ रोजीच्या प्राप्त प्रस्तावानुसार परिक्षणाकरीता पथक निर्माण करण्यात येईल.

या कामाकरीता प्रति पथक एका मोहल्ल्याचे संपुर्ण परिक्षणाकरीता रु. ३,०००/- खर्च अपेक्षीत असुन स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या मोहल्ला संख्येच्या आधारावर होणारा एकुण खर्च अवलंबुन राहिल.

स्वच्छ मोहल्ल्यांमध्ये सहभागी होणाऱ्या मोहल्ल्यांचे परिक्षण व गुणांकन करुन त्यामध्ये उत्कृष्ट येणाऱ्या मोहल्यांना खालरीलप्रमाणे पारितोषीक देण्याचे प्रस्तावीत आहे.

<table>
<tr><td>प्रथम पारितोषीक रु. २५ लक्ष प्रति मोहल्ला</td><td>प्रथम तीन उत्कृष्ट मोहल्यां करीता</td><td>पारितोषीकाची एकुण रक्कम रु. ७५ लक्ष</td></tr>
<tr><td>व्दितीय पारितोषीक रु. १० लक्ष प्रति मोहल्ला</td><td>व्दितीय पाच उत्कृष्ट मोहल्यांकरीता</td><td>पारितोषीकाची एकुण रक्कम रु. ५० लक्ष</td></tr>
<tr><td>तृतीय पारितोषीक रु. ५ लक्ष प्रति मोहल्ला</td><td>तृतीय ७ उत्कृष्ट मोहल्यांकरीता</td><td>पारितोषीकाची एकुण रक्कम रु. ३५ लक्ष</td></tr>
<tr><td colspan="3">स्पधेमध्ये सहभागी मोहल्ल्यांपैकी नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणारे तसेच स्पर्धाकालावधीमध्ये जलदगतीने चांगले बदल घडविणाऱ्या मोहल्ल्यांकरीता (Innovative & Fast Moving Mohalla) करीता प्रति मोहल्ला रु. १ लक्ष असे तिन मोहल्ल्यांरकरीता रु. ३ लक्ष</td></tr>
<tr><td>एकुण पारितोषीकांकरीता रक्कम</td><td colspan="2">रु. १६३ लक्ष</td></tr>
</table>

उक्त प्रस्तावानुसार पारितोषीकांकरीता रु.१६३ लक्ष + कार्यक्रमाचे आयोजन तसेच इतर प्रसार प्रचार याकरीता रु. १० लक्ष + विजेता मोहल्यांना सम्मानचिन्ह, प्रमाणपत्र इत्यादी करीता रु. ३ लक्ष असे एकुण रु. १७६ लक्ष खर्च सदर मोहल्ला स्पर्धेकरीता अपेक्षीत आहे. याव्यतिरीक्त सहभागी मोहल्यांचे गुणांकनाकरीता अखिल भारतीय स्वराज्य संस्था यांना प्रति मोहल्ला रु. ३,०००/- नुसार स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्याच्या संख्येवर आधारीत एकुण खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च पद क्र. A२४००१२२०३०१ मधुन भागविण्याचा प्रश्न विचारात घेण्याचे मान्यतेस सादर.

**टिप**:- सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

# <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 246/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 03/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर व नागपूर @२०२५ यांचे संयुक्त विद्यमानाने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छ मोहल्ला स्पर्धा आयोजित करण्याचे प्रस्तावीत आहे. या स्पर्धेमध्ये शहरातील विविध भागातील जास्तीत-जास्त मोहल्ला सहभागी होण्याकरीता स्वच्छ मोहल्ला स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या मोहल्यामध्ये किमान २०० व जास्तीत जास्त ५०० घरांचा समावेश राहील. स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्याची तपासणी करुन गुणांकन देण्यात येईल.

स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्यामध्ये स्पर्धेच्या कालावधीमध्ये घडुन आलेले विशेष बदल तसेच मोहल्यामध्ये राबविण्यात आलेल्या नाविन्यपुर्ण उपक्रमाबाबतची नोंद घेण्यात येईल. याकरीता विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये कार्यरत स्वच्छ भारत अभियानाचे विभागीय समन्वयक/मा. संपादक यांची मदत घेण्यात येईल तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे दि. ०४/०१/२०२३ रोजीच्या प्राप्त प्रस्तावानुसार परिक्षणाकरीता पथक निर्माण करण्यात येईल.

या कामाकरीता प्रति पथक एका मोहल्ल्याचे संपुर्ण परिक्षणाकरीता रु. ३,०००/- खर्च अपेक्षीत असुन स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या मोहल्ला संख्येच्या आधारावर होणारा एकुण खर्च अवलंबुन राहिल.

स्वच्छ मोहल्ल्यांमध्ये सहभागी होणाऱ्या मोहल्ल्यांचे परिक्षण व गुणांकन करुन त्यामध्ये उत्कृष्ट येणाऱ्या मोहल्यांना खालरीलप्रमाणे पारितोषीक देण्याचे प्रस्तावीत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रथम पारितोषीक रु. २५ लक्ष प्रति मोहल्ला | प्रथम तीन उत्कृष्ट मोहल्यां करीता | पारितोषीकाची एकुण रक्कम **रु. ७५ लक्ष** |
| व्दितीय पारितोषीक रु. १० लक्ष प्रति मोहल्ला | व्दितीय पाच उत्कृष्ट मोहल्यांकरीता | पारितोषीकाची एकुण रक्कम **रु. ५० लक्ष** |
| तृतीय पारितोषीक रु. ५ लक्ष प्रति मोहल्ला | तृतीय ७ उत्कृष्ट मोहल्यांकरीता | पारितोषीकाची एकुण रक्कम **रु. ३५ लक्ष** |
| स्पधेमध्ये सहभागी मोहल्ल्यांपैकी नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणारे तसेच स्पर्धाकालावधीमध्ये जलदगतीने चांगले बदल घडविणाऱ्या मोहल्ल्यांकरीता (Innovative & Fast Moving Mohalla) करीता प्रति मोहल्ला रु. १ लक्ष असे तिन मोहल्ल्यांरकरीता रु. ३ **लक्ष** | | |
| **एकुण पारितोषीकांकरीता रक्कम** | **रु. १६३ लक्ष** | |

उक्त प्रस्तावानुसार पारितोषीकांकरीता रु.१६३ लक्ष + कार्यक्रमाचे आयोजन तसेच इतर प्रसार प्रचार याकरीता रु. १० लक्ष + विजेता मोहल्यांना सम्मानचिन्ह, प्रमाणपत्र इत्यादी करीता रु. ३ लक्ष असे एकुण रु. १७६ लक्ष खर्च सदर मोहल्ला स्पर्धेकरीता अपेक्षीत आहे. या व्यतिरीक्त सहभागी मोहल्यांचे गुणांकनाकरीता अखिल भारतीय स्वराज्य संस्था यांना प्रति मोहल्ला रु. ३,०००/- नुसार स्पर्धेमध्ये सहभागी मोहल्याच्या संख्येवर आधारीत एकुण खर्च अपेक्षीत असुन सदरचा खर्च पद क्र. A२४००१२२०३०१ मधुन भागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**